# <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग</u>

## मुं.मे.रे.कॉ. तर्फे "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा
## मराठी बोला, मराठीतच शिका, मराठी भाषा टिकवा - अभिनेते सुमित राघवन

**मुंबई, १ फेब्रुवारी, २०२३ -** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) व्दारे आयोजित "मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा" समारोप सोहळा आज पार पडला. यावेळी अष्टपैलू कलाकार, अभिनेते सुमित राघवन यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवली. तसेच मुं.मे.रे.कॉ.च्या व्यवस्थापकिय संचालक श्रीमती. अश्विनी भिडे यांच्यासह विविध विभाग प्रमुखांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

दरम्यान, "मुंबईसारख्या मेट्रोपॉलिटिन शहरात इतर भाषांची सरमिसळ होत असताना आपल्या (मराठी) भाषेवर अतिक्रमण होऊ नये. यासाठी मराठी भाषेचे संवर्धन होणे आवश्यक आहे. म्हणून दरवर्षी आपण मराठी भाषा संवर्धन पंधवरडा साजरा करतो," असे व्यवस्थापकिय संचालक श्रीमती. अश्विनी भिडे म्हणाल्या.

तसेच अभिनेते सुमित राघवन यांनी, "साहित्य, संस्कार, संस्कृतीने परिपूर्ण आपली ही भाषा सर्वांना यायलाच हवी," असे सांगत. "मराठी भाषा केवळ वाचण्यापूरती मर्यादित न राहता त्यात शिक्षण घेणे आवश्यक आहे. आपली मराठी भाषा ही घराघरात पोहोचली पाहिजे," असे आवाहन उपस्थितांना केले.

यावेळी श्री. एस. के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), श्री. ए. ए. भट, संचालक (प्रणाली), श्री. अबोध खंडेलवाल, संचालक (वित्त), श्री. आर. रमणा, कार्यकारी संचालक (नियोजन), श्री. राजीव (रोलिंग स्टॉक), श्री. राजीव कुमार (सिग्नल आणि टेलिकॉम) आणि मुं.मे.रे.कॉ.चे इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त आयोजित विविध स्पर्धेत सहभागी झालेल्या विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त १४ ते २८ जानेवारीदरम्यान शब्दकोडे, प्रश्न मंजुषा, चारोळी, काव्य लेखन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुं.मे.रे.कॉ.च्या कर्मचाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धेतील विजेत्यांची नावे -

शब्दकोडे -

१) चारूहास जाधव, कार्यकारी संचालक (स्थापत्य)

२) सुरदास भोसले, सुरक्षा पर्यवेक्षक

३) सनिदेव काळोखे, सुरक्षा रक्षक

प्रश्न मंजुषा -

१) उमेश गवंडे, उपमहाव्यवस्थापक (लेखा)
२) मयुर कदम, कनिष्ठ अभियंता (विद्युत)
३) गौरी कार्तिकेय, उपलेखपाल

चारोळी -

१) अश्विनी ब्राम्हणे सहाय्यक (प्रशासन विभाग)
२) स्वप्निल ठोकळ, उप अभियंता
३) सागर खोलमकर, कनिष्ठ सहाय्यक

काव्य लेखन -

१) योगेश गोताड, शिपाई (नियोजन विभाग)
२) रंजीत नायर, उप अभियंता (विद्युत)
३) रेखा माझिरे, कनिष्ठ सहाय्यक (पुनर्वसन व पुनर्वसाहत विभाग)*(समाप्त)*

For further information please contact: -

Vaidehi More/ Sr.AGM (PR)
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse/ AM (PR)
8369727364
niti.tamse@mmrcl.com